ICSE ACADEMY
www.spellbeeacademy.com

SpellIndia
INDIA's No. 1
SPELLING BEE
Preparatory Study Material Provider
www.phonicsestore.com

Pati's

# PREPARE

for

# ICSE

Class 10

# Marathi

Questions ONLY

A Collection of Questions from Prelim exam papers of various ICSE schools

Pati's

# ICSE ACADEMY: How to Prepare for ICSE Class 10 exams

https://www.spellbeeacademy.com/icse.html

## How to Prepare for ICSE Class 10 exams : Free Resources

Please click on subject to proceed further.


We will keep adding resources here till "March 2026".


So, save this link, keep visiting and stay updated.


( Resources include : Syllabus, Past Year Papers, Specimen Papers, Competency based Questions, Books pdf downloadable, 350+ Term Papers / Prelim Papers of various schools - across subjects, etc. )


01 English Literature
02 English Language
03 Geography
04 History & Civics
05 Physics
06 Chemistry
07 Mathematics
08 Biology
09 Computer Applications
10 Physical Education
11 Hindi
12 Commercial Studies
13 Economics
14 Technical Drawing
15 Environmental Science
16 Home Science
17 Gujarati
18 Marathi
19 French


## ***Scan QR code to buy at amazon Now.***




















































**SCAN QR code to buy the book at amazon NOW.**



ICSE ACADEMY

# Set 1 : Question Papers

1. Garodia, Mumbai
2. Shisuvan, Mumbai
3. Green Acres, Mumbai
4. Aspee Nutan, Mumbai
5. St Mary's ICSE, Navi Mumbai

Pati's ICSE ACADEMY

QUESTION PAPER 1

# P. G .GARODIA SCHOOL [ I.C.S.E ]
## FIRST PRELIMINARY EXAMINITION
## SUB : MARATHI
## STD : X

MARKS : 80
TIME : 3 HRS.

DAY : SATURDAY

*Answers to this Paper must be written on the paper provided separately.*
*You will not be allowed to write during the first 15 minutes.*
*This time is to be spent in reading the Question Paper.*
*The time given at the head of this Paper is the time allowed for writing the answers.*

P. G. GARODIA SCHOOL (ICSE)

### विभाग - 1. गदय

### ८. उर्जाशक्तीचा जागर

या युनियन हायस्कूलमधले शिक्षक, त्यांची सेवाभावी वृत्ती, विदयार्थ्यांना शिकवताना त्यामध्ये त्यांचे स्वत: ला झोकून देणे आणि निरपेक्ष भावनेने केलेले मार्गदर्शन यामुळे माझ्या केवळ शालेय अभ्यासासाच पाया पक्का झाला. शिक्षणाबद्दल एक आंतरिक ओढ वाढू लागली.

आमच्या हायस्कूलमध्ये दर शनिवारी चाचणी परिक्षा घेण्यात येत असे. आमचं हायस्कूलही गरीब होतं, त्यामुळं उत्तरपत्रिका घरून न्यावी लागायची. त्यावेळी तिची किंमत फक्त तीन पैसे असायची. आपल्याला कदाचित पटणार नाही; पण तेव्हा दर आठवड्याला हे तीन पैसे उभे करताना देखील माझ्या अंगावर काटा उभा राहतो. तिने माझ्यासाठी प्रचंड कष्ट केले. पडेल ते काम केले. कॉंग्रेस हाऊसजवळ काही काम मिळणार आहे, असं समजल्यान एकदा ती तिकडं गेली. रांगेत उभी राहिली, तशीच तडकलत; पण त्यावेळी तिला सांगण्यात आलं, की फक्त तिसरी किंवा त्यापेक्षा अधिक शिकलेल्यांनाच काम दिलं जाईल. हे ऐकून अर्थातच ती नाराज झाली, घराकडं मागं फिरली. त्याच वेळी तिनं ठरवलं,की 'मी माझ्या मुलाला खूप शिकवीन, कारण शिक्षणाशिवाय या जगात मान नाही.

तिनं प्रत्यक्षात केलंही तसंच. माझ्यासाठी तिनं घेतलेले कष्ट मी कोणत्या शब्दांतून सांगू? कोरे, पाठकोरे, लिहून उरलेले कागद ती एकत्र. जमवायची आणि त्याच्या वहया करून दयायची. अखंड पेन्सिल मिळण मला अवघड होत. त्यामुळे जेमतेम हातात धरता येईल अशा पेन्सिलनेच लिहावं लागे.

**प्रश्न.1.अ) वरील उता-याच्या आधारे प्रश्नांची उत्तरे लिहा.** [2]

**1. एका वाक्यात उत्तरे लिहा**

i) लेखकाला शिक्षणाबद्दल आंतरिक ओढ का वाढू लागली?

ii) लेखकाची आई कश्याप्रकारे वहया तयार करायची?

**आ) आकृतिबंध पूर्ण करा.** [4]

i) काम न मिळाल्याने आईच्या मनात आलेले विचार
↓ ↓

ii) युनियन हायस्कूलमधील शिक्षकांची वैशिष्ट्ये
↓ ↓

**इ). स्वमत लिहा.** [2]

1. उता-याच्या आधारे पाठातील लेखकाच्या आईचे वर्णन तुमच्या शब्दांत लिहा.



Pati's ICSE ACADEMY

Pati's
ICSE ACADEMY

## 4. शाल

कविवर्य नारायण सुर्वे खूप सभा व संमेलने गाजवत. पुढे ते साहित्य संमेलनाचे अध्यक्ष झाले. परिच त्यांच्या कार्यक्रमांना अहोरात्र भरतीच असे. प्रत्येक कार्यक्रमात सन्मानाची शाल आणि श्रीफळ त्यांना मि राही. एकदा ते मला म्हणाले,"या शाली घेऊन आता मी शालीन बनू लागलो आहे." त्यांच्या बोलण्यातील उपरोधिक खोच माझ्याच नव्हे तर कोणाच्याही सहजपणे लक्षात येणारी होती.

शाल व शालीनता यांचा संबंध काय? खरे तर, खरीखुरी शालीनता शालीविनाच शोभते! सुर्वे मुळातच शालीन. शालींच्या वर्षावाखाली त्यांची शालीनता कधी हरवली नाही,
कधी क्षीणही झाली नाही.

मी कविवर्यांना म्हटले,"शालीमुळे शालीनता येत असेल तर मी कर्जबाजारी होईन. भिकेला लागेन; पण शेकडो शाली खरेदी करून सर्वांना एकेक शाल बगेचाय नेऊन देईन." ग्यावर तो शालीन कवी मनापासून हसला.

शालीमुळे शालीनता येते की जाते? या प्रश्नाचे माझे उत्तर जाते असेच आहे. सन्मान करण्याच्या रूपाने आपण खरे तर एक शालीन जग गमावून बसण्याचा धोकाच मोठा आहे.

---

**प्रश्न. 2. अ) वरील उता-याच्या आधारे प्रश्नांची उत्तरे लिहा.**

**1. एका वाक्यात उत्तरे लिहा.** [4]

i) नारायण सुर्वे यांचा मुळातला स्वभाव कोणता?

ii) नारायण सुर्वे यांच्यावर कशाचा वर्षाव झाला?

iii) एकदा सुर्वे लेखकाला काय म्हणाले?

iv) प्रत्येक कार्यक्रमात सुर्वेना काय मिळत असे?

**आ) आकृतिबंध पूर्ण करा.** [2]

i)

| शालीमुळे शालीनता येत असेल तर लेखक काय होईल? |
|---|

↓ ↓

**इ) स्वमत: लिहा.** [2]

'शाल व शालीनता' यांचा पाठाच्या आधारे कळलेला अर्थ लिहा.

## विभाग - 2. पदय

**2. संतवाणी (अ)**

अग्निमाजि पडे बाळू ।
माता धावे कनवाळू ॥1॥
तैसा धावे माजिया काजा ।
अंकिला मी दास तुझा ॥2॥
सर्वेचि झेपावे पक्षिणी ।
पिलीं पडतांचि धरणी ॥3॥

**प्रश्न. 3. अ) वरील कवितेच्या आधारे प्रश्नांची उत्तरे लिहा.**

**1. एका वाक्यात उत्तरे लिहा.** [2]

i) माता केव्हा धावून जाते?

ii) कवितेत आलेल्या 'काजा' शब्दाचा अर्थ लिहा?

P.G. GAROLIA SCHOOL (ICSE)



Pati's
ICSE ACADEMY

'सवाच झपावे पक्षिणी । पिली पडतांचि धरणी'॥ या ओळींचे रसग्रहण करा. [3]

स्वमत: लिहा. [3]

) संत नामदेवांनी परमेश्वराकडे केलेली विणवणी तुमच्या शब्दांत लिहा.

**दोन दिवस**

दोन दिवस वाट पाहण्यात गेले दोन दु:खात गेले.
हिशोब करतो आहे किती राहिलेत डोईवर उन्हाळे
शेकडो वेळा चंद्र आला तारे फुलले रात्र धुंद झाली;
भाकरीचा चंद्र शोधण्यातच जिंदगी बरबाद झाली.
हे हात माझे सर्वस्व दारिद्रियाकडे गहाणच राहीले.

**प्रश्न.4.अ) वरील कवितेच्या आधारे प्रश्नांची उत्तरे लिहा.**

**1.एका वाक्यात उत्तरे लिहा.** [4]

i) चंद्राला दिलेली उपमा कोणती?

ii) कवीचे सर्वस्व असलेली गोष्ट कोणती?

iii) कवीचा जवळचा मित्र कोणता?

iv) कवीच्या मते डोक्यावर उरलेले काय?

**आ) 'दोन दिवस वाट पाहण्यात गेले दोन दु:खात गेले' या ओळीचे रसग्रहण करा.** [2]

**इ) स्वमत: लिहा.** [2]

i) "दोन दिवस" या कवितेतून मिळणारा संदेश तुमच्या शब्दांत लिहा.

## विभाग - 3. स्थूलवाचन

**प्रश्न.5.खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

1. मेटलायझिंग प्रक्रियेवर काम न होण्यामागची कारणे लिहा. [3]
2. 'आधी केले मग सांगितले' या उक्तीची यथार्थता स्पष्ट करा. [3]
3. होमी भाभा यांनी विद्यार्थ्यांना कोणते मार्गदर्शन केले? [2]

## विभाग - 4. भाषाभ्यास

**प्र.6.व्याकरण व भाषिक घटकांवर आधारीत उत्तरे लिहा.**

**1.खालील वाक्यप्रचारांचे अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.** [8]

i) पर्वणी असणे

ii) भारावून जाणे

iii) आंतरिक ओढ वाटणे

iv) धीर न सोडणे

**2. खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा.** [2]

i) कीव ii) संघर्ष

**3. खालील शब्दांचे विरुध्दार्थी शब्द लिहा** [2]

i) चांगले × ii) मित्र ×

**4.खालील शब्दांचे वचन बदला.** [2]

i) रस्ता ii) चेहरा

**5.खालील शब्दांचे लिंग बदला.** [2]

i) आई ii) समाजसेवक



P.G. GARODIA SCHOOL (ICSE)
Pati's ICSE ACADEMY

## विभाग - 5. उपयोजित लेखन

**प्र.7. खालील कृती सोडवा.**

### अपठीत गदय आकलन

विद्वत्ता कोणाकडेही असो ती क्षणात मिळवता येणारी बाब नाही. ज्याप्रमाणे झाडाची मुळे एकदम खोल-खोल जाऊ शकत नाहीत, त्यासाठी महिने व वर्षे लागतात; परंतु जेवढी खोल मुळे असतात, तेवढा त्या झाडाचा पाया भक्कम असतो. तसेच विद्वत्तेचेही आहे. जेवढ्या प्रयत्नांनी ती मिळवाल, तेवढे प्रभावी तुमचे व्यक्तिमत्त्व असेल. आपल्याला एकदाच विजेसारखे चमकायचे की, सूर्यासारखे सातत्याने प्रकाशित रहायचे, हे ठरवायचे आहे. विद्वत्ता ही अशी गोष्ट आहे, जी केवळ वेळेच्या सदुपयोगाने मिळते. बरे, तिला कोणी तुमच्याकडून काढून किंवा चोरून घेऊ शकत नाही. ती मिळवण्यात खूप धनसंपत्ती खर्ची करावी लागत नाही; पण एकदा ती तुमच्याजवळ आली, की संपूर्ण राष्ट्र तुमच्या लखलखत्या प्रकाशात दिपून जाते. आपला कोणी सन्मान करावा अशी भावनाच मनातून निघून जाते, सर्वजण तुमच्या सहवासात येण्यासाठी, तुमचे आदरातिथ्य करण्यासाठी आतुर असतात. थोडक्यात, विद्वत्ता तुम्हांला सर्व मिळवून देते, ज्याची तुम्ही स्वप्नातही अपेक्षा केलेली नसते.

**प्रश्न.1. वरील उतारा वाचून प्रश्नांची उत्तरे लिहा.**

(अ) खालील घटनेचा व कृतीचा परिणाम लिहा.

i) झाडाची मुळे खोल जाणे...... [2]

ii) प्रयत्नांनी विदया मिळवणे......

iii)

| विद्वत्तेची वैशिष्ट्ये |
|---|
| ↓ ↓ ↓ ↓ |

[4]

(ब) विद्वत्तेचे आपल्या जीवनातील महत्त्व तुमच्या शब्दांत लिहा. [2]

**प्र.8. खालीलपैकी एका विषयावर पत्रलेखन करा.** [8]

> झाडे लावा...झाडे जगवा
> हिरवाई ट्रस्ट, तळेगांव दाभाडे
> जागतिक पर्यावरण दिनानिमित्त
> रोपांचे मोफत वाटप
> **संपर्क - हिरवाई ट्रस्ट, बालोद्यान मार्ग,तळेगांव दाभाडे**
> hirwaitrust@gmail.com

i) विदयार्थी प्रतिनिधी या नात्याने शाळेत वृक्षारोपण करण्यासाठी रोपांची मागणी करणारे पत्र लिहा.

ii) विदयार्थी प्रतिनिधी या नात्याने चांगल्या उपक्रमाबाबत हिरवाई ट्रस्टचे अभिनंदन करणारे पत्र लिहा.

**प्र.9. खालील मुद्दयांना अनुसरून निबंध लिहा.** [8]

सार्वजनिक व वैयक्तिक स्वच्छता ← **स्वच्छतेचे महत्त्व** → सध्याची परिस्थिती

↓

दुष्परिणाम व सध्याची परिस्थिती

**********



Pati's ICSE ACADEMY

shishuvan

## MARATHI – STD X

*Maximum Marks : 60*
*Time allowed: 2 hours*
*Answers to this Paper must be written on the paper provided separately.*
*You will **not** be allowed to write during the first **15** minutes.*
*This time is to be spent in reading the Question Paper.*
*The time given at the head of this paper is the time allowed for writing the answers.*

*The intended marks for questions or parts of questions are given in brackets [ ].*

### विभाग १ - गद्य (१३)

**प्र. १ उतारा वाचून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा** [१३]

**राधा :** आई, हे काय आहे गं कोपऱ्यात?
**आई :** अगं, ती सतार आहे. ती आजोबांना इनाम म्हणून मिळालीय महाराजांकडून! गावाकडे होती, ती आज आणली आहे.
**राधा :** इनाम...? इनाम म्हणजे काय गं आई?
**आई :** (हसून) अगं, इनाम म्हणजे बक्षीस!
**राधा :** अगं, माझ्या वर्गातील तनया आहे ना... तिचे आडनाव आहे 'इनामदार'.
**आई :** हो...मला माहीत आहे ती.
**राधा :** इनाम म्हणजे बक्षीस. मग इनामदार म्हणजे...आईऽऽ कसा झाला असेल गं हा शब्द तयार?
**आई :** थांब. आजोबांच्या खोलीत मराठी व्युत्पत्ती कोश आहे. आपण पाहूया हं त्यात 'इनाम' शब्द कसा तयार झाला असेल? त्याची व्युत्पत्ती आपल्याला त्यात सापडेल.

**इनाम न. कायमची देणगी, मोफत वतन, बक्षीस**
**Prize, gift, inam, grant**
**[अर. इन्+आम्=वरिष्ठाकडून देणगी]**

**आई :** बघितलंस का राधा? हे इथे 'अर.' लिहिले आहे ना! म्हणजे हा अरबी भाषेतला शब्द आहे. आता आपण दार हा प्रत्यय शोधू.

**दार प्र. स्वामित्वदर्शक फारसी प्रत्यय.**
**A termination showing possession**

व्युत्पत्ती म्हणजे शब्दाच्या अर्थाचे किंवा शब्दाच्या मुळाचे ज्ञान. एखाद्या शब्दाच्या मुळाविषयी माहिती देणे म्हणजे व्युत्पत्ती सांगणे. अशा अनेक शब्दांच्या व्युत्पत्तींचा संग्रह म्हणजे व्युत्पत्ती कोश. भाषेत अनेक कारणांनी बदल होत जातात.

**प्र. १ अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.** [४]
१. इनाम हा कोणत्या भाषेतील शब्द आहे ?
२. दार हा कोणत्या भाषेतील प्रत्यय आहे ?
३. इनामदार प्रमाणे दार या प्रत्ययाने शेवट होणारे आणखी २ शब्द लिहा.
४. आजोबांना महाराजांकडून इनाम काय मिळाले होते ?

Pati's
ICSE ACADEMY

प्र. १ आ) पुढील माहिती वाचून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे पूर्ण वाक्यात लिहा. [३]

दिवाळी स्त्री. दिव्यांची रांग, एक सण (दिव्यांसंबंधी)
A row of lights (hence) a Hindu Festival with nocturnal illuminations.
[सं. दीपावलि, दीपालि; प्रा. दिवाली, दीवावली, बं. दिउयाली; ओ. दिआली;
हिं/पं. दिवाली, सिं. डिआरी, गु. दिवाळी]

१. दिवाळी शब्दाचे लिंग कोणते आहे ?
२. दिउयाली हा कोणत्या भाषेतील शब्द आहे ?
३. कोणत्या २ भाषेत दिवाळीसाठी समान शब्द आहे ?

प्र. १ इ) थोडक्यात उत्तर लिहा. [२]
व्युत्पत्ती कोश म्हणजे काय ते ४-५ वाक्यांत स्पष्ट करा.

प्र. १ ई) पुढील तक्ता पूर्ण करा. [४]

| भाषा | मूळ शब्द | मराठी शब्द |
|---|---|---|
| संस्कृत | तुण्ड | ________ |
| कन्नड | तुप्प | ________ |
| अरबी | इत्र | ________ |

## विभाग २ - पद्य (१२)

प्र. २ अ) कविता पूर्ण करा. [३]
१) सन्मार्ग ................ आकाश दे.

प्र. २ आ) कविता वाचा व विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा. [९]

झाड बसते ध्यानस्थ ऋषिसारखं मौन व्रत
धारण करून तपश्चर्या करत...
पक्षी झाडांचे कुणीच नसतात
तरीही झाड त्यांचं असतं
मुळावर घाव घातला तरी झाड मुकाट सहन करते
झाडांच्या पानावरून वहीच्या पानावर
अलगद उतरतात दवांचे टपोरे थेंब
झाडाकडे टक लावून पाहिलं तर
शरीरभर विरघळतो हिरवा रंग
रक्त होते क्षणभर हिरवेगार
आयुष्य होतं नुकत्याच खुडलेल्या फुलासारखं टवटवीत
झाडाचे बाहु सरसावलेले असतात मुसाफिराना कवेत घेण्यासाठी

Pati's
ICSE ACADEMY

Pati's
ICSE ACADEMY

**क) एका वाक्यात उत्तरे लिहा.** [३]

१. झाडाच्या मुळावर घाव घातल्यावर त्याची प्रतिक्रिया काय असते ?
२. झाडांकडे पाहिल्यावर कोणता रंग शरीरभर विरघळतो ?
३. झाडाला कोणाची उपमा दिलेली आहे ?

**ख) पुढील शब्दांचे समानार्थ कवितेतून शोधा व लिहा. (कोणतेही २)** [२]

१. वृक्ष - ________ २. अंग - ________ ३. वर्ण - ________

**ग) एक- दोन शब्दांत उत्तरे लिहा .** [२]

१. झाडांच्या पानावरून वहीच्या पानावर अलगद उतरणारे -
२. झाडाचे बाहू यांना कवेत घेण्यासाठी सरसावलेले असतात -

**घ) पुढील ओळींचा अर्थ इंग्रजीत स्पष्ट करा.** [२]

पक्षी झाडांचे कुणीच नसतात
तरीही झाड त्यांचं असतं

## विभाग ३ - व्याकरण (१५)

**प्र. ३ अ) व्याख्या व दोन उदाहरणे लिहा.** [२]

१) सर्वनाम
२) क्रियापद -

**प्र. ३ आ) योग्य विरामचिन्हे वापरून वाक्य पुन्हा लिहा.** [३]

१) शीतकपाटात गाजर कोबी काकडी आणि मेथी या भाज्या ठेवल्या आहेत
२) तू शाळेतून किती वाजता परत येशील
३) अरेरे सर्व दूध सांडले

**प्र. ३ इ) ~~वाक्याचा प्रकार ओळखा.~~** तक्ता पूर्ण करा [१०]

| पुरुष व वचन | सर्वनाम | वर्तमानकाळ | भूतकाळ | भविष्यकाळ |
|---|---|---|---|---|
| प्र. पु. ए. व. | मी | पडतो | | |
| प्र. पु. अ. व. | आम्ही | | | पडू |
| द्वि. पु. ए. व. | तू | | | |
| द्वि. पु. अ. व. | तुम्ही | | | |
| तृ. पु. ए. व. पुं. | तो | | पडला | |
| तृ. पु. ए. व. स्त्री. | ती | पडते | | |
| तृ. पु. ए. व. नपुं. | ते | | | |
| तृ. पु. अ. व. पुं. | ते | | | पडतील |
| तृ. पु. अ. व. स्त्री. | त्या | | | |

Pati's
ICSE ACADEMY

## विभाग ४ - उपयोजित लेखन (२०)

प्र. ४ अ) **पुढीलपैकी कोणत्याही एक विषयावर १६० ते २०० शब्दांत निबंध लिहा.** [०८]

१. नदीचे मनोगत

**मुद्दे :** प्रास्ताविक प्रसंग रेखाटन, नदीचे उगमस्थान, नदीच्या पाण्याचा वापर, प्रदूषण, पूर्वीच्या व आताच्या रूपातील फरक, माणसांविषयी नदीच्या मनातील राग किंवा निराशा, कळकळीची विनंती, सामाजिक संदेशाने किंवा सुंदर कवितेने शेवट.

२. मी आरसा बोलतोय......

**मुद्दे :** प्रास्ताविक प्रसंग रेखाटन, निर्मिती व शोध,शास्त्रीय तत्त्व, आरशाकडे पाहण्याचा दृष्टीकोन, आरशाचे महत्त्व, आरशाचा आनंद व खंत, माणसाच्या चेहऱ्यावरचा भाव हाच त्याच्या मनाचा भाव

**किंवा(OR)**

**पुढीलपैकी कोणत्याही एका विषयावर औपचारिक पत्र लिहा.**

१. तुमच्या शाळेतील जत्रेसाठी (For Fair) लागणारे समान मागविण्यासाठी स्टेशनरी दुकानाच्या विक्रेत्याला पत्र लिहा.

२. तुमच्या घरी २ दिवसांपासून गढूळ / प्रदूषित (polluted) पाणी येत असल्याची तक्रार (complaint) करणारे पत्र बृहन्मुंबई महानगरपालिकेला लिहा.

प्र. ४ आ) **पुढील अपठित उतारा वाचून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.** [०६]

महाभारताची रचना महर्षि वेद व्यास यांनी केली. हा ग्रंथ मूळ संस्कृतमध्ये आहे. पहिल्या टप्प्यात याचे नाव 'जय' होते. त्यात आठ हजार आठशे (८,८००) श्लोक होते. दुसऱ्या टप्प्यात श्लोकांची संख्या एक लाख (१,००,०००) झाली आणि तो ग्रंथ 'महाभारत' या नावाने प्रसिद्ध झाला. महाभारताची मुख्य कथा कुरुक्षेत्रावरील महायुद्धाची आहे. जे युद्ध हस्तिनापूरच्या राजगादीसाठी कौरव आणि पांडवांत झाले. ही फक्त कौरव - पांडवांच्या संघर्षाची कथा नसून भारतीयांचे धर्मशास्त्र आहे. म्हणून याला पाचवा वेद म्हणतात.

धृतराष्ट्र आणि पांडू हे दोघे भाऊ होते. त्यांची राजधानी हस्तिनापूर होती. धृतराष्ट्र आंधळा असल्याने तो मोठा भाऊ असूनही पांडूला राजा बनविले होते. याच राजाचे पाच पुत्र होते. युधिष्ठिर, अर्जुन, भीम, नकुल आणि सहदेव ही त्यांची नावे होती. हे पाच पुत्र म्हणजेच महाभारताचे पाच 'पांडव' म्हणून प्रसिद्ध होते.

क) **एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही २)** [२]

१. महाभारताची रचना कोणी केली ?

२. महाभारताचे पहिले नाव काय होते ?

२. धृतराष्ट्राची राजधानी कोणती होती ?



Pati's ICSE ACADEMY

**ख)** **थोडक्यात उत्तरे लिहा.** [४]

१. ५ पांडवाची नावे उताऱ्यातून शोधा व लिहा.

२. महाभारताचे २ टप्पे स्पष्ट करा.

**प्र. ४** **इ)** **पुढील अपठित पद्य वाचून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.** [०६]

सुंदर किती पहाट !
घालुनि केशरसडे शिंपली
पूर्व दिशेची वाट !
लाल गुलाबी उडे धुरळा
त्यात मिसळला प्रकाश पिवळा
सूर्याचा रथ चढुनी आला
आभाळाचा घाट !
पक्षी सारे उंच उडाले
मंजुळ गाणी गाऊ लागले
रविराजाची कीर्ती गाती
गोड गळ्यांचे भाट !

**क)** **पुढील ओळींचा अर्थ इंग्रजीत स्पष्ट करा.** [४]

१ . पक्षी सारे उंच उडाले
मंजुळ गाणी गाऊ लागले

२. रविराजाची कीर्ती गाती
गोड गळ्यांचे भाट !

**ख )** **एका वाक्यात उत्तरे लिहा.** [२]

१. सूर्य कोणत्या दिशेने उगवतो ?

२. सूर्योदयाच्या वेळी आकाशात कोणकोणते रंग दिसून येतात ?

☺☺☺☺☺☺☺☺☺☺**All the best**☺☺☺☺☺☺☺☺☺

Pati's
ICSE ACADEMY

# QUESTION PAPER 3

The Green Acres Academy
Chembur

| Grade: 10 | Subject: Marathi<br>Prelim 1 Exam | Maximum Marks: 20<br>Time: 45 min |
|---|---|---|

***Instructions***

*Answers to this Paper must be written on the paper provided separately.*
*You will not be allowed to write during the first 15 minutes.*
*This time is to be spent in reading the question paper.*
*The time given at the head of this Paper is the time allowed for writing the answers.*

**प्रश्न १.खालील पठित उतारा वाचा आणि विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.** **(३)**

आता दुसरा अनुभव सांगतो. ट्रेनिंग स्कूलमधील प्रशिक्षण संपवून मी बार्कमध्ये इंजिनियर म्हणून जॉईन झालो. तेव्हा तिथे मेटलायझिंग प्रक्रियेवर मला काम करायला सांगण्यात आलं. आमच्याकडे त्यासाठी यंत्रसामग्री होती; पण कोणीही ती वापरली नव्हती, म्हणून मी म्हणालो, "मी यावर काम करतो; पण यासाठी मला एक वेल्डर व एक फोरमन यांची गरज आहे." तेव्हा मला सांगण्यात आलं, "तुला आता काहीच मदत मिळणार नाही, तुला स्वत:लाच सर्व करावं लागेल." वरिष्ठांची आज्ञा म्हणून मी सुरुवात केली आणि बरीच धडपड करून ते काम पूर्ण केलं, मग त्यांनी त्या कार्यक्रमाची व्याप्ती वाढवली. 'हे करूया, ते करूया', असं बरंच काय काय म्हणाले आणि मग विचारलं, "आता सांग, तुला काय पाहिजे? तुला वेल्डर मिळेल, फोरमन मिळेल, आणखी जे हवे असेल ते सर्व मिळेल." यावर मी म्हणालो, "आता मला काहीच नको. मी स्वत: सर्व करीन." तेव्हा ते म्हणाले, "काम सुरू करण्याआधीच लोक काय काय मागण्या करतात आणि या वृत्तीमुळेच आतापर्यंत ते काम झालेलं नव्हतं, म्हणून आम्ही तुला वेल्डर व फोरमन द्यायला 'नाही' म्हणालो होतो. मात्र आता तुझ्या हाताखाली पाहिजे तेवढे लोक घे, आता ते तुझं ऐकतील, कारण त्यांनी पाहिलंय, तू हे करू शकतोस आणि आता हेही लक्षात घे, की एकटा माणूस जास्त काम करू शकत नाही." थोडक्यात काय, तर तुम्ही करू शकता हे आधी दाखवा, मग इतरांना काम सांगा. आपल्याला येत नसताना दुसऱ्यांना काम सांगणं योग्य नाही. हा धडा त्या दुसऱ्या अनुभवातून मी शिकलो.

प्रश्न -
i. लेखकांना कोणत्या प्रक्रियेवर काम करण्यास सांगण्यात आले?
ii. लेखक या दुसऱ्या अनुभवातून काय शिकले?
iii. लेखकांना कोणाच्या मदतीची गरज होती?

**प्रश्न २. खाली दिलेल्या प्रश्नांतील उत्तराचा योग्य पर्याय निवडा.** **(३)**

i. निरंजनचा शेवटचा पेपर कोणता होता? [1]
अ. संस्कृत ब. नागरिकशास्त्र क. गणित



Pati's
ICSE ACADEMY

Pati's
ICSE ACADEMY

ii. निरंजनची मावशी कुठे राहत होती? [1]
अ. पुणे ब. सिंधुदुर्ग क. चिपळूण

iii. साहस, परी, बोध हे कशाचे प्रकार आहेत? [1]
अ. कादंबरी ब. कथा क. चरित्र

**प्रश्न ३. रिकाम्या जागा भरून वाक्य पुन्हा लिहा.** **(२)**

i. कचेरी सुटली, की मी __________ रस्त्याने धावत येऊ लागलो. [1]

ii. वर घोंघावे बंबारा, पुढे कल्लोळ ________. [1]

**प्रश्न ४. एका वाक्यात उत्तरे लिहा.** **(२)**

i. अभिषेकने कोणता निश्चय केला? [1]

ii. कवितेतील दीनदुबळे म्हणजे? [1]

**प्रश्न ५. खालील प्रश्नाचे थोडक्यात उत्तर लिहा.** **(२)**

i. चरित्र आणि आत्मचरित्र यातील फरक सांगा.

**प्रश्न ६. समानार्थी शब्द सांगा.** **(२)**

i. उत्कंठा - [1]

ii. कथा - [1]

**प्रश्न ७. विरुद्धार्थी शब्द सांगा.** **(१)**

i. सुरुवात x [1]

**प्रश्न ८. खालील सामासिक शब्दांचा समास ओळखा.** **(२)**

i. यथान्याय - [1]

ii. जागोजागी - [1]

**प्रश्न ९. खालील वाक्प्रचाराचा अर्थ सांगा** **(२)**

i. गळा काढणे [1]

ii. मात करणे [1]

**प्रश्न १०. खालील म्हणींचा अर्थ सांगा.** **(१)**

i. नाचता येईना अंगण वाकडे [1]



Pati's
ICSE ACADEMY

# ASPEE NUTAN® ACADEMY

(AFFILIATED TO CISCE)

## PRELIMINARY EXAMINATION

**Grade :** X **Subject:** MARATHI **Marks:** 8(

**Date :** **Time :** 2

- *You will not be allowed to write during the first 15 minutes.*
- *This time is to be spent in reading the question paper.*
- *The time given at the head of this paper is the time allowed for writing the*
- *This paper consists of 6 printed pages*
- *Answer to this paper must be written on the sheets provided :*
- *Attempt all questions as per the given instructions.*

### SECTION I [10 ma

**Question 1**

खालील पाठ्य उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा. [१०]

पहाटेची, सकाळची वेळ अभ्यासाला योग्य असते, हा भडसावळे गुरुजींनी दिलेला सल्ला अगदी योग्य होता.सकाळच्या टवटवीत आणि प्रसन्न वातावरणात अभ्यास खूप छान होतो. शरीरही पुरेशा विश्रांतीमुळे ताजंतवानं बनलेलं असतं. प्रसन्न वातावरणामुळे मनही अभ्यासात चटकन लागू शकतं. हवेत सुखद गारवा असतो. दुरून एखादी भूपाळी किंवा रेडिओवरचं आवडतं भक्तिगीत ऐकू येत असतं. ते नसेल तर पक्ष्याचं सुमधुर संगीत साथीला असतंच. अशा आल्हाददायक वातावरणात संस्कृतचा एखादा श्लोक चटकन पाठ होतो. एरवी न कळलेलं गणित चटकन कळतं. त्याची रीतही लक्षात राहते, हा निरंजनचा अनुभव. त्यामुळेच भडसावळे गुरुजींचा हा सल्ला त्याला मोलाचा वाटे.

(अ) खालील प्रश्नाचे थोडक्यात उत्तर लिहा. [२]

प्रस्तुत पाठाचा विषय -

(ब) खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा. [२]

(१) प्रस्तुत पाठातून कोणत्या मूल्याची शिकवण मिळते-

(२) अभ्यासासाठी योग्य वेळ कोणती?

(क) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

(१) सकाळच्या टवटवीत आणि ......... वातावरणात अभ्यास खूप छान होतो.

Pati's
ICSE ACADEMY

(ड) खालील विधान उताऱ्याच्या आधारे पूर्ण करा. [१]

अशा आल्हाददायक वातावरणात.......................

(इ) खालील अर्थाचे उताऱ्यात आलेले समानार्थी शब्द लिहा. [१]

(१) उपदेश

(२) पद्धत

(ई) स्वमत - [३]

'निरंजन खरा नागरिक' ह्या विधानातील सत्यता तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.

## SECTION- II [10 Marks]

**Question 2**

खालील कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा. [१०]

नाही मुठीमध्ये द्रव्य
नाही शिरेमध्ये रक्त,
काय करावें कळेना
नाही कष्टाचे सामर्थ्य;
जीव ओवाळावा तरी
जीव किती हा लहान;
तुझ्या शौर्यगाथेपुढे
त्याची केवढीशी शान;
ार घोंघावे बंबारा,
ुढे कल्लोळ धुराचे,
ाडाडत्या तोफांतून,
ुझें पाऊल जिद्दीचे;
ुझी विजयाची दौड
ोळे भरून पहावी;
ोळ्यांतील आसवांची
ज्योत ज्योत पाजळावी
ाशा असंख्य ज्योतींची
तुझ्यामागून राखण;
दीनदुबळ्यांचे असें

Pati's
ICSE ACADEMY

Pati's ICSE ACADEMY

(अ) खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा. [४]

(१) या कवितेचा विषय काय आहे?

(२) या कवितेतून कोणता संदेश मिळतो?

(ब) खालील ओळींचा सरळ अर्थ लिहा. [२]

अशा असंख्य ज्योतींची
तुझ्यामागून राखण;
दीनदुबळ्यांचे असें
तुला एकच औक्षण.

(क) खालील अर्थाचे कवितेत आलेले शब्द लिहा. [१]

(१) ओवाळणी (२) अश्रू

(ड) स्वमत - [३]

"सैनिक सीमेवर तैनात असतो, म्हणून आपण सुरक्षित राहतो." या विधानातील भाव स्पष्ट करा.

## SECTION- III [8 Marks]

**Question 3**

खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा. [८]

(१) 'निसर्ग हा मोठा जादूगार आहे', हे विधान वाळवंटी प्रदेशाच्या संदर्भात कसे लागू पडते, ते पाठाच्या आधारे सविस्तर लिहा.

(२) तुम्ही 'कॅक्टस' या वनस्पतीकडून काय शिकाल?

## SECTION- IV [30 Marks]

**Question 4 – A**

दिलेल्या पर्यायातून अचूक उत्तराची निवड करा. [८]

(अ) समानार्थी शब्द लिहा. [२]

(१) तहान -

(i) तुष्णा (ii) तीक्ष्ण (iii) तृष्णा (iv) तृष्न

(२) जिद्द -

(i) हिंमत (ii) हार (iii) हिमत (iv) हीमत

(ब) विरुद्धार्थी शब्द लिहा. [२]

(१) गरम

(i) घार (ii) थांड (iii) उष्ण (iv) थंड

Pati's ICSE ACADEMY

Pati's ICSE ACADEMY

(२) वर

(i) वरती (ii) खाली (iii) नीचे (iv) खालीं

(क) लिंग बदला [२]

(१) दुबळा -

(i) दुबळी (ii) दुबळे (iii) दूबळी (iv) दुबळ्य

(२) लेखक -

(i) लेखिका (ii) लेखक (iii) लेखका (iv) लेखकी

(ड) वचन बदला. [२]

(१) फळ -

(i) फळ (ii) फळ्या (iii) फळे

(२) पान -

(i) पण (ii) पान (iii) पाने पणे

## Question 4 – B

(अ) खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा. (फक्त ४) [६]

(१) आनंदाश्रू येणे.

(२) नंदनवन होणे.

(३) राखण करणे.

(४) जीव ओवाळणे.

(५) खटाटोप करणे

## Question 4 - C

(अ) खालील वाक्यांचे कंसातील सूचनेनुसार वाक्य परिवर्तन करा.(फक्त ३) [३]

(१) निशा काम करते. (आज्ञार्थी करा.)

(२) फिरायला सर्वांना आवडते. (प्रश्नार्थी करा.)

(३) वा! किती छान देखावा आहे! (विधानार्थी करा.)

(४) हे उत्तर चूक आहे. (नकारार्थी करा.)

(ब) शुद्ध शब्द ओळखा. (फक्त २) [१]

(१) द्रव्य, द्रावय, दव्य, दव्या

(२) जोत, जोता, ज्योत, ज्योट

(३) जिव, जीव, झीव, जिब

(क) खालील वाक्यांना योग्य विरामचिन्हे द्या. (फक्त २)

(१) असं म्हणून गुरुजींनी निरंजनला हृदयाशी धरलं तेव्हा सार्‍यांचेच डोळे पाण

(२) नाही रे बाळा. तू उत्तम नागरिक आहेस.

(३) कधी तर दोन दोन तीन - तीन वर्षे पावसाचा ठिकाणा नसतो.

Pati's ICSE ACADEMY

Pati's
ICSE ACADEMY

(ड) खालील शब्दसमूहाला एक शब्द द्या. (फक्त २) [२]

(१) चारही बाजूंनी -

(२) साहित्य लिहिणारा -

(३) विज्ञानाचे संशोधन करणारा -

Question 4 - D

(अ) पुढील वाक्यातील क्रियापद ओळखून प्रकार लिहा. (फक्त २) [२]

(१) आई वर्तमानपत्र वाचते.

(२) ताई चित्र काढत आहे.

(३) माई जोरात चालते.

(ब) खालील वाक्यातील उभयान्वयी अव्यय ओळखा. (फक्त ३) [१ $\frac{१}{२}$]

(१) राम आणि श्याम शाळेत जातात.

(२) मी मित्राच्या घरी गेलो पण तो घरी नव्हता.

(३) मी अभ्यास केला म्हणून मला पेपर सोपा गेला.

(४) सुमन उद्या किंवा परवा गावाला जाईल.

(क) खालील वाक्यातील केवलप्रयोगी अव्यय ओळखा. (फक्त ३) [१ $\frac{१}{२}$]

(१) वा! किती सुंदर बाग आहे.

(२) बापरे! केवढा मोठा साप.

(३) अरेरे! लागले त्याला.

(४) अबब! केवढी उंच इमारत.

(ड) खालील वाक्यातील काळ ओळखून प्रकार लिहा. (फक्त २) [१]

(१) तो झाडाला पाणी घालतो.

(२) मी पुस्तक वाचले.

(३) काकी कामाला जाणार.

(इ) खालील वाक्यातील अशुद्ध शब्द शुद्ध करून वाक्य पुन्हा लिहा.(फक्त २) [२]

(१) वाळवटी प्रदेशात वर्षातून एखादाच पाउस पडतो.

(२) निरजन आज भल्या पहाठेस उठून अभ्यासाला बसला होता.

(३) कॅक्टस हे अमेरीका खंडातले जाड आहे.

Pati's
ICSE ACADEMY

Pati's
ICSE ACADEMY

## SECTION- V [12 Marks]

Question 5

(अ) खालील दिलेल्या विषयावर एक पत्र लिहा. [६]

आईच्या तब्येतीची चौकशी करणारे पत्र लिहा.

किंवा

तुमच्या विभागात बरेच दिवस दूषित पाणीपुरवठा होत आहे याविषयी तक्रार करणारे पत्र महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागीय अधिकाऱ्याला लिहा.

(ब) खालील मुद्दयांवर आधारित गोष्ट लिहा. तिला योग्य शीर्षक आणि तात्पर्य द्या. [६]

मुद्दे : एक भिकारी........ देव प्रसन्न .....वरदान........सुवर्णमोहोरा मागणे ... .....देवाची अट........ज्या सुवर्णमोहरा जमिनीवर पडतील त्याची माती होईल... .....अट मान्य........ भिकाऱ्याने जुनी झोळी पसरणे........देवाचे सुवर्ण मोहरा ओतत जाणे........भिकाऱ्याला लोभ........झोळी फाटणे........ पश्चाताप.

## SECTION- VI [10 Marks]

Question 6

दिलेल्या विषयांपैकी एका विषयावर निबंध लिहा. [१०]

(१) जंगले एक देणगी

मुद्दे : जंगले एक देणगी ........ जंगलातील वन्यजीवन ........ जंगलातून मिळणारी संसाधने ........ जंगलामुळे वातावरणात समतोलता ........ प्रदूषण कमी ........ शहरीकरणाच्या नावाखाली जंगलतोड ........ जंगल तोड थांबवणे परम कर्तव्य.

(२) सैनिकाचे आत्मवृत्त.

मुद्दे : जन्म ........ शिक्षण ........ कुटुंब........ सैनिकी शिक्षण ........ सैनिकी जीवनाचा थरार आणि अनुभव........ शौर्य ........ आयुष्यभर देशसेवा ........ देशवासियांना संदेश.

(३) मला पंख असते तर !

मुद्दे: मनात विचार कसा आला? ........ पंख असल्यावर काय काय करणार? ........मजाच मजा........ पण काही अडचणी ........ सद्यस्थितीच चांगली .

****************THE END********************

Pati's
ICSE ACADEMY

St. Mary's ICSE School, Koparkhairane
Second Preliminary Examination
Marathi
(One hour)

Grade: X

Marks:40

---

Answer all the questions.
Answer to this paper must be written on the paper provided separately.
The time given at the head of this paper is the time allowed for writing answers.
The intended marks for questions or parts of questions are given in the bracket [].
You should begin each answer on a fresh page.
The subparts of each question should be written together.
**This paper consists of 4 printed pages.**

---

## विभाग 'अ' (१५ गुण )

**प्रश्न १.**

**खाली दिलेल्या विषयावर पत्रलेखन करा.**

१.तुमच्या मित्राला/ मैत्रिणीला वाढदिवसानिमित्त घरी येण्याचे आग्रहाचे आमंत्रण पत्र लिहा. (७)

**प्रश्न २.**

**अ खालील वाक्य वाक्याच्या आशयानुसार कोणत्या प्रकारात मोडतात ते लिहा.** (२)

१. मुलांनो,अभ्यास करा.

२. किती सुंदर देखावा आहे हा!

**आ] विधानरचनेवरून पडणारे वाक्याचे प्रकार लिहा.** (२)

१.त्याने खूप अभ्यास केला आणि तो पास झाला.

२.जेव्हा आकाशात ढग जमतात तेव्हा मोर नाचू लागतो.

**इ] विरामचिन्हे घालून वाक्य पुन्हा लिहा.** (२)

१.आपणही त्यांच्याप्रमाणेच खेळावे अशी इच्छा मनात येईल

२.आज शेवटचा नागरिक शास्त्राचा पेपर

**ई] कंसात दिलेल्या सूचनेनुसार उत्तरे लिहा.** (२)

१.ताई सायकल किंवा बसने प्रवास करते. ( उभयान्वयी अव्यय ओळखा व लिहा.)

२.आपण सर्वजण मित्र आहोत. (सर्वनाम ओळखा व लिहा.)

Pati's ICSE ACADEMY

## विभाग 'ब' (२५ गुण)

**प्रश्न ३.**

**खालील उतारा वाचा व प्रश्नांची उत्तरे लिहा.**

त्यानंतर एक आनंदाची गोष्ट घडली. माझ्या वडिलांची बदली परत पुण्यास झाली. माझ्या आई-वडिलांना वाय. एम. सी. ए. मधील खेळाडूंकडून माझ्या खेळाबाबत स्तुतीपर उद्गार ऐकू येऊ लागले, ते ऐकून त्यांना आनंद वाटे. माझे वडील स्वतः व्हॉलीबॉल चँपियन होते. त्यामुळे ते मला खेळात नेहमीच प्रोत्साहन देत. एकदा दुपारी त्यांना जेवणाचा डबा घेऊन गेलो असताना त्यांनी मला दुकानात नेले व सहा रुपयांस एक जुनी बॅट विकत घेऊन दिली. ती बॅट पाहून माझा आनंद गगनात मावेना. मी तसाच ती बॅट घेऊन मित्रांना दाखवत सुटलो. त्या वेळेस वडिलांचा मासिक पगार अवघा चोवीस रुपये होता. माझे वडील अभ्यास व शाळा यांबाबतीत फारच कडक असत. एकदा मी शाळा चुकवून ग्राऊंडवर क्रिकेटचा एक मित्रत्वाचा सामना पाहत बसलो होतो. वडील घरी आले तेव्हा त्यांनी मला पाहिले व संतापाने छड्या मारत शाळेत नेऊन बसवले. त्या क्षणापासून मी शाळा कधीच चुकवली नाही.

**खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१.वडिलांची बदली परत कुठे झाली? (१)
२.बॅट मिळाल्या नंतर लेखकाने काय केले? (१)
३.लेखकाचे वडील कोणत्या खेळात चँपियन होते? (१)
४.वडिलांचा मासिक पगार किती होता? (१)
५.वडील कोण कोणत्या बाबतीत कडक होते? (१)
६.शाळा चुकवून लेखक काय करीत होते? (२)
७.वडिल का संतापले? (२)

**प्रश्न ४.**

**कविता वाचा व प्रश्नांची उत्तरे लिहा.**

झाड बसते ध्यानस्थ ऋषिसारखं मौन व्रत
धारण करून तपश्चर्या करत...
पक्षी झाडांचे कुणीच नसतात
तरीही झाड त्यांचं असतं
मुळावर घाव घातला तरी झाड मुकाट सहन करते
झाडांच्या पानावरून वहीच्या पानावर
अलगद उतरतात दवांचे टपोरे थेंब
झाडाकडे टक लावून पाहिलं तर
शरीरभर विरघळतो हिरवा रंग
रक्त होते क्षणभर हिरवेगार
आयुष्य होतं नुकत्याच खुडलेल्या फुलासारखं टवटवीत

Pati's ICSE ACADEMY

Pati's
ICSE ACADEMY

झाडाचे बाहु सरसावलेले असतात मुसाफिराना कवेत घेण्यासाठी
पानझडीनंतर झाड पुन्हा नवीन वस्त्र धारण करतं
नव्या नवरीसारखं
झाडाला पालवी फुटल्यावर फुटते शरीरभर पालवी
अन झटकली जाते मरगळ
पक्षांच्या मंजुळ नादात झाडाचंही जीवनाचं
एक संथ गाणं दडलेले असते
हसावं कसं सळसळत्या पानासारखं
मुळावं मुरावं कसं तर? झाडांसारखं घट्ट पाय रोवीत
जगावं कसं तर? हिरवंगार झाडासारखं
रोजचं चिंतन करावं कसं तर झाडासारखं!

**अ) खाली दिलेल्या प्रश्नांची एका शब्दात उत्तरे लिहा.** (२)

१.कवीने झाडाला दिलेली उपमा -

२.पानझडीनंतरचे नवी वस्त्रे धारण करणारे झाड म्हणजे -

३.कवीच्या मते उत्साही आयुष्य म्हणजे -

४.अलगद उतरणारे थेंब -

**आ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. झाडाच्या जीवनाचं गाणं कशात दडलेलं असतं? (१)

२. झाडाच्या मुळावर घाव घातल्यावर त्यांची प्रतिक्रिया काय असते? (१)

३. पानझडीनंतर हे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा. (१)

**इ) खालील प्रश्नाचे उत्तर लिहा.**

१.झाडकडे टक लावून पाहिल्यानंतर घडणाऱ्या गोष्टी लिहा. (२)

**प्रश्न ५.**

**उतारा वाचा व प्रश्नांची उत्तरे लिहा.**

रात्री दोन वाजता शेवटची गाडी इथून जाते. त्यानंतर पहाटेस कुणीतरी हा उपद्व्याप जाणीवपूर्वक केला असावा. आता प्रवाशांनी भरलेली नऊ पन्नासची गाडी येईल. निरंजन एकदम सावध झाला. गाडी आली तर भयंकर अपघात होईल हे त्याच्या लक्षात आलं. निरंजन नागरिकशास्त्राचा पेपर, देशमुखांकडचं जेवण सारं विसरला. त्याच्या डोळ्यांसमोर धाड् धाड् आवाज करत येणारी रेल्वेगाडी दिसू लागली. कानठळ्या बसवणारा आवाज आणि लोकांच्या किंकाळ्या कानात घुमू लागल्या. स्टेशन इथून खूप दूर होतं. तीन-चार किलोमीटर तिथपर्यंत सांगायला जायचं तर परीक्षा बुडणार होती. मग नापास झाल्यामुळे गुरूजींची मदत बंद. शिक्षणही बंद. रेल्वेने फिरायचं स्वप्न अपुरंच राहणार होत; परंतु मन मानायला तयार नव्हतं. त्याने क्षणभर विचार केला आणि स्टेशनच्या दिशेने धाव घेतली. तो स्टेशनात शिरला तेव्हा नऊ पन्नासची गाडी नुकतीच आली होती. आता पाच मिनिटांतच ती सुटणार होती.

Pati's
ICSE ACADEMY

**अ) खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१. शेवटची गाडी किती वाजता जाते?

२. निरंजनच्या काय लक्षात आले?

३. निरंजन काय विसरून गेला?

४. स्टेशन किती किलोमीटर लांब होते?

५. कोणते स्वप्न अपुरे राहणार होते?

६. निरंजन स्टेशनमध्ये शिरला तेव्हा काय दिसले?

७. परीक्षा बुडली तर काय होणार होते?

**आ) खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा.**

१. बेसावध X  २. पास X

ICSE ACADEMY

Pati's
ICSE ACADEMY

# Prepare for ICSE CLASS 10
# Marathi

## Free Resources

## SCAN QR CODE Now

**Scan QR code** for Free Access to
500+ Prelim Papers across 20 subjects

